**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 7.384
Volume - 8, Issue - 7, July - 2025

DOIs:10.2018/SS/202507014 --:-- Research Paper / Article / Review

# झाडीपट्टीतील नाटककार चुडाराम बल्लारपुरे यांचे नाट्यलेखन- एक अभ्यास

**डॉ. प्रीती किशोर उमाठे,**
मराठी विभाग प्रमुख डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, भामटी रोड, नागपूर
Email - priteeumathe@gmail.com

***सारांश:*** *मराठी साहित्याचा अभ्यास करीत असताना वेगवेगळ्या बोलीभाषा व प्रदेश हा नेहमी अभ्यासण्यात येते. परंतु झाडी बोलीभाषा ही दुर्लक्षित राहिल्यामुळे त्यामधून येणारे साहित्यही पाहिजे त्याप्रमाणे समाजापर्यंत म्हणजेच झाडीपट्टीतील भाग वजा करता उर्वरित महाराष्ट्रापर्यंत पाहिजे त्या पद्धतीने पोचलेले नाही. परंतु चुडाराम बल्लारपुरे यांच्या कौटुंबिक, सामाजिक, पौराणिक, आणि महानाट्य कृतीमुळे मुंबई पुण्यासारख्या ठिकाणी सुद्धा आज झाडीपट्टी रंगभूमी पोहोचलेली आहे. त्यामुळे चुडाराम बल्लारपुरे यांचे झाडीपट्टी रंगभूमीसाठी महत्त्वाचे योगदान आहे.*

***बीज शब्द:*** *महानाट्य, सुअंग, रस्टिकेट, रहस्य, कलावंत, नाटककार.*

## 1. प्रस्तावना:

कविता कथा कादंबरी या सर्व साहित्य प्रकारांपेक्षा नाटक हा साहित्यप्रकार अतिशय वेगळा आहे तो वाचता तर येतोच परंतु तो दृक आणि श्राव्य प्रकारात सुद्धा मोडत असतो. म्हणूनच या प्रश्नाची कोड करणे गरजेचे आहे. कारण नाटक हा प्रकार दृकश्राव्य स्वरूपाचा असला तरी तो वाचत असताना आपल्या बुद्धी पटलावर एक दृश्य उभे करून त्याचे अनुभव आपल्याला यामधून होत असते. जसे एखादा कथाकार किंवा कादंबरीकार घटना प्रसंग अथवा व्यक्तीचे स्वभाव चित्र रेखाटित असतो त्याच पद्धतीने नाटक या प्रकारामध्ये तेथील निवेदनाच्या आधारावर घटना प्रसंग जसेच्या तसे आपल्या डोळ्यासमोर उभे राहत असते. समाजातील प्रत्येक लहान मुलापासून तर थोरामोठ्यांपर्यंत नाटक हा शब्द सर्वांनीच ऐकलेला आहे. त्याचा मूळ अर्थ हा सोंग करणे असा होतो असे अभ्यासकांचे मत आहे. कारण सोंग करणे किंवा रूप घेणे या लोकसंस्कृती पासूनच नाटकाची सुरुवात झाली असावी असे मानल्यास हरकत नाही.

जगद्‌गुरु संत तुकाराम महाराजांनी विश्वनाट्य संकल्पनेचा अभंगांमधून उत्तमरीत्या उद्धार केलेला आहे ते सांगतात की,

## 2. "बहुरूपी रूपे नटला नारायण |

**सॉग संपादून जैसा तैसा** | (तुकाराम गाथा ओवी क्रमांक २५०१)

तुकाराम महाराजांनी नाटकाच्या व कलावंताच्या बहुरूपी सोंगांबद्दल अभंगांमधून मत मांडले आहे. अगदी त्याच पद्धतीने रा. चिं. ढेरे म्हणतात की, संतांनी सोंग घेणे या अर्थाने अवगणी घेणे, रूप धरणे, मायावेश धारण करणे अशी शब्दावली ही त्यांनी वापरलेली आहे. सोंग या शब्दाचे ज्ञानेश्वरीतील रूप सोआंग (ज्ञा. ११.८३) असे असून, अन्यत्र अनेक ग्रंथांमध्ये स्वांग असे वापरलेले आहे. सॉग हे सुलभिकृत रूप आद्यग्रंथापासून आजपर्यंत प्राचीन्याने आढळते. मला वाटते सॉग या शब्दाचे उत्पादन सोआंग आणि स्वंग या त्यांच्या प्राचीन रूपावरून करणे शक्य होईल. सोंग या शब्दातील घटक स्व + अंग असे नाहीत तर सु + अंग कसे आहेत. सु + अंग म्हणजे

उत्तमांग, मस्तक, मुख कोणाही व्यक्तीचे देहदारी प्राण्याची व्यक्तिमत्व त्यांच्या उत्तम अंगावरून व्यक्त होते; उत्तमांग बघून असलेले कबंध हे व्यक्तित्व शून्य मानले जाते. शत्रूचा शिरच्छेद करून शिर पळवणे हा प्रकार शिरोभागात व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तित्व साठवले असल्याच्या धारणेशी निगडित आहे. यावरून सोंगाचा मूलार्थ मुखवट्याशी संबंध आहे, हे आपल्या ध्यानी येईल. सोंग घेणे म्हणजे केवळ मुखवटा धारण करून रूपांतरित करणे. ज्या भूमिकेचा मुखवटा धारण केला जातो, त्या भूमिकेचे नटाच्या ठिकाणी अवतरण घडते असे आदिम नाट्यात मानले गेले आहे."(1) असे म्हणतात. मराठी साहित्यामध्ये नाटक हा साहित्यप्रकार पूर्वीपासून समाज घटकात प्रचलित आहे. भारतात वेगवेगळ्या प्रांतामध्ये वेगवेगळ्या रंगभूमीवर नाटकाचे सादरीकरण होत असते अगदी त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यामध्ये नाट्य रंगभूमीकरिता पुणे व मुंबई ही दोन शहरे महत्त्वाची मानली असली तरी झाडीपट्टी रंगभूमी सुद्धा नाट्य क्षेत्रामध्ये आपला वेगळा थाट घेऊन उभी आहे. मराठी भाषेची बोलीभाषा ही झाडी बोलीभाषा व तेथील प्रदेश हा आजही आपले नाट्यतंत्र टिकवून आहे. म्हणूनच चुडाराम बल्लारपुरे यांची नाटके अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केलेला आहे.

## 3. चुडाराम बल्लारपुरे यांचे नाट्य लेखन

चुडाराम बल्लारपुरे यांच्या मनात वाचन किंवा लेखन करीत असताना नाटक लिहिण्यासंदर्भातील प्रश्न त्यांना एक वेळी नाटकाचा प्रसिद्ध लेखक बनवणार हा विचार सुद्धा त्यांनी कधी केलेला नसला तरीही त्यांच्या मनात सतत नाट्य लिखाणाबद्दल एकांकिका लिखाणाबद्दल विचार येत होते. त्या काळामध्ये दैनिक लोकमत वृत्तपत्रांमधून बालकथा येत असायच्या आणि त्या बालकथा वाचण्याचा सपाटा बल्लारपूर यांनी लावल्यामुळे त्यांनाही हळूहळू आपणही कथा लिहिल्या पाहिजे असे वाटू लागले हाच विचार प्रत्यक्षात उतरवण्याकरिता त्यांनी तुकडोजी महाराजांच्या भाषणात महाराज ज्या स्वर्ग नरकाच्या कथा सांगत होते त्याच कथा आपल्या शब्दात चुडाराम बल्लारपुरे यांनी लिहून काढल्या आणि त्यांनी तीच कथा आपल्या मित्रांना सुद्धा ऐकवली. खऱ्या अर्थात येथूनच चुडाराम बल्लारपुरे यांना लिखाणाची प्रेरणा मिळाली.

त्यानंतर अनेक हिंदी मराठी लेखकांची प्रेम कथांची, बालकथांची, नाटककारांची, लिखित नाटके, बालकथा त्यांनी वाचली. आणि त्यामधूनच त्यांना लिखाणाची प्रेरणा मिळत गेली व ते कथा लेखनाच्या माध्यमातूनच नाट्य लिखाण सुद्धा आपण केले पाहिजे असा विचार करू लागले. येथूनच नाट्य लिखाणाचा सुद्धा चुडाराम बल्लारपुरे यांनी प्रारंभ केलेला दिसून येतो. त्यात त्यांनी लोकमत या वृत्तपत्रांमधून सतत येणाऱ्या कथांचे लिखाण स्वतःच्या हस्ताक्षरात करण्यास सुरुवात केली आणि दिवाकरांच्या नाट्यछटा शाळेत शिकवल्यानंतर काही कथा त्यांच्यासारख्याच त्यांनी लिहून काढल्या.त्यानंतर त्यांच्या मनात येऊ लागली की गणेशोत्सव आणि दुर्गोत्सवात सादर होणारी नाटके पाहतांना आपल्यालाही असे लेखन करता येईल का? असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाला.

याआधीही चुडाराम बल्लारपूर यांनी आपल्या शालेय जीवनामध्ये मित्रांच्या आग्रह खातर रस्टिकेट हे नाटक लिहिले होते. चुडाराम बल्लारपूरे यांनी नाटकाच्या लिखाणाला शालेय जीवनात सुरुवात केली असली त्यांची पडद्यावरील नाटकेही आत्मप्रेरणेतून निर्माण होऊ लागली. चेतना ही स्वमनाला एखाद्या प्रतिभावंत लेखकाला कशी जागृत करते हे त्यांच्या नाटकांचे उदाहरणच आहे. त्यांचे ‘रूपा पारू’, ‘रहस्यमय वाडा’, ‘नौका डोली जीवनाची’ अशा अनेक नाटकांपासून सुरुवात केली. परंतु काही अडचणींचा सामना करत बल्लारपुरे यांनी गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी या तालुक्याच्या बाहेर प्रगती रंग मंदिर या नाट्यसंस्थेच्या माध्यमातून आपल्या नाटकाचे प्रयोग सुरू ठेवले. तुकाराम बल्लारपूर यांचे ‘बहूढोंगी समाधीवाले बाबा’ हे नाटक पहिले सामाजिक नाटक म्हणून गाजले. अंधश्रद्धा बुवा बाबा यावर विश्वास ठेवणारी पिढी आणि त्यामधून निर्माण होणारे पेज विकृत होत जाणारा समाज या नाटकामधून बल्लारपुरे यांनी प्रेक्षकांसमोर आणला. त्यानंतर अन्याया अत्याचाराविरुद्ध लढणाऱ्या गरीब पिढीत शोषित वर्गाला सहाय्य करणारे

वर्गाचे चित्रण करणारे नाटक म्हणजे ‘स्पेशल रिपोर्ट’ होय. या नाटकाला बहुमूल्य असा मान मिळाला. मुंबईच्या धरतीवर झाडीपट्टीतील प्रयोग होणारे हे नाटक पहिलेच नाटक ठरले. त्यानंतर त्यांचे रहस्यमयीन नाटक सुद्धा प्रसिद्धीस आले. त्यात ‘डाव तिमिराचा’ हे नाटक झाडीपट्टी रंगभूमीवर आजही नऊ देतांना खेळवून ठेवणाऱ्या. तसेच चुडाराम बल्लारपूर यांची कौटुंबिक नाटके सुद्धा रंगभूमीवर अतिशय उत्कृष्टपणे सादर झालेली आहेत. त्यात ‘अतृप्त मी राहिले’,‘दगाबाज’, ‘कहानी माझ्या संसाराची’ इत्यादी नाटके प्रेक्षकांच्या भेटीला आली. यानंतर सर्वात जास्त गाजलेले पौराणिक नाटक तब्बल दहा वर्षांनी रंगभूमीवर आले. एखादा प्रतिभावंत लेखक म्हणजेच तो साधूमुनी असतो त्याला आपल्या लेखणीला धार देण्यासाठी त्याग करावा लागतो तप करावा लागतो. म्हणून चुडाराम बल्लारपूर यांच्या दहा वर्षानंतर आलेल्या या पौराणिक नाटकाला प्रेक्षकांनी सुद्धा तोच मान दिला. ते नाटक म्हणजे ‘महामृत्युंजय मार्कंडेश्वर’ हे होय. हे नाटक नसून महानाट्यच आहे असेच वाटते. कारण ५१ कलावंत आणि १५ तंत्रज्ञ यांच्या भव्यताप्यासह हे नाटक झाडीपट्टीचा रंगभूमीवर फिरू लागले. यासोबतच मार्कंडेश्वर देवालयाच्या जवळून वाहणारी नदी नाटकात दाखवण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुद्धा यात केलेला होता. म्हणूनच चुडाराम बल्लारपुरे यांच्या नाटकाचे तंत्र हे ग्रामीण असले तरी अतिशय वेगळ्याच पद्धतीचे होते असेच म्हणावे लागते. झाडीपट्टीतील रंगभूमीच्या परिसरात अनेक लेखकांनी नाट्य लेखन केलेले आहे परंतु चुडाराम बल्लारपुरे यांनी आपल्या दमदार प्रतिभावंत शक्तीचे नाट्य लिखाणाच्या माध्यमातून वेगळे स्थान निर्माण केले तसेच तुळाराम बल्लारपूर यांनी गडचिरोलीतील कुरखेडा येथे घडलेल्या हत्याकांडाला सुद्धा हुबेहूब नाट्यात्मक रित्या जसेच्या तसे उभे केलेले आहेत. ही साधी सोपी गोष्ट नसून एखाद्या प्रतिभावंत व्यक्तीला आपल्या प्रतिभेच्या बळावर एखादे चित्रण कशा पद्धतीने चित्रित करता येते आणि ते सुद्धा कोणतीही व्यवस्था उपलब्ध नसताना. महाराष्ट्राचा मागासलेला भाग म्हणून गडचिरोली जिल्हा ओळखला जातो त्यामधूनही चुडाराम बल्लारपुरे यासारखे प्रतिभावंत व्यक्तींनी नाटक कथा कविता यांच्या माध्यमातून मराठी साहित्याला झाडी बोली या बोलीभाषेत ला महत्त्व प्राप्त करून दिलेले आहे. त्यांच्या नाटकांमधून अंधश्रद्धा व काही नाटकांमधून विरोधाभासी भावनांचा निचरा होत असला तरी त्या त्यांनी समाजामधून घेतलेल्या गोष्टी या त्यांच्या नाटकांमधून समोर आलेले आहेत असे अभ्यासांती वाटते.

## संदर्भ ग्रंथ

१) प्रा. जोशी व ढेरे रा. चिं., भारतीय रंगभूमीच्या शोधात. पृ. १५

२) फडके ना. सी., प्रतिसाधन, अंजली प्रकाशन मुंबई

३) भगत दत्ता, मराठी नाटक आणि रंगभूमी चा इतिहास

४) डॉ. मुनघाटे प्रमोद, मराठी झाडीपट्टी रंगभूमी एक : लोक चळवळ, अंतर्गत लेख. डॉ. नाईकवाडे राजेंद्र, डॉ. जयस्वाल राजन, संपादित. समकालीन मराठी रंगभूमी, विजय प्रकाशन, नागपूर

५) बोरकर हरिश्चंद्र, "झाडीपट्टीची दंडार", दास्ताने आणि कंपनी प्रकाशन पुणे,

६) मोहरकर श्याम, "लोकनाट्य झाडीपट्टीतील लोककला", जलावली स्मरणिका (संपा.) ६४ वे विदर्भ साहित्य संमेलन तळोधी (बा.)

७) मेश्राम, वासेकर, मुसने व इतर संपादक," प्राचार्य श्याम मोहरकर गौरव ग्रंथ, अंतरभूत लेख, डॉ. बोरकर हरिश्चंद्र, "झाडीपट्टी रंगभूमी : आकलन आणि आस्वाद", राघव पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स नागपूर